Vol-13 Special Issue- 1.3 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# शैक्षणिक परिप्रेक्ष्यातून ‘वसुधैव कुटूंबकम’ या वैश्विक मूल्याची रुजवणुक

**प्राचार्य डॉ. संजय शेजव**
स्व. संजय टोम्पे व स्व. समीर देशमुख शिक्षण महविद्यालय, चांदुर बाजार

## प्रस्तावना

मानव हा समाजशील प्राणी आहे. तो ज्या कुटुंबात जगतो,ते कुटुंब एक समाजाचा घटक आहे. खऱ्या अर्थाने कुटुंबापासूनच माणसाच्या जीवनाची धडपड सुरू होत असते. कुटुंब हे समाजाच्या केंद्रस्थानी असते. या कुटुंबातून आणि असंख्य कुटुंब मिळून समाज तयार होत असतो. हे कुटुंब गावाचं ,समाजाचं जिल्ह्याचं, राज्याचं,देशाचं आणि विश्वाचं प्रतिनिधित्व करीत असते.या कुटुंबामध्ये कुटुंबप्रमुख आणि इतर सदस्य यामध्ये त्याचा परस्पर संबंध घडून येत असतो. म्हणूनच कुटुंबामध्ये जे समायोजन साधल्या जाते ते खऱ्या अर्थाने त्या कुटुंबाला ऊर्जा देणारं असते. त्याप्रमाणे कुटूंबामध्ये अनेकविध प्रवृत्तींशी जुळवून घेताना खरा कस सुद्धा लागत असतो.आपण ज्या पद्धतीने समाजाला आपलसं करू तसाच प्रतिसाद आपल्यालाही मिळतो. मनातील भावनांचे विचारांचे आदानप्रदान करताना समाजाशी आपले नाते अधिक दृढ होत जाते. कुटुंब संस्थेचे व्यापक स्वरुप म्हणजेच समाज संस्था.कुटुंब, समाज,राज्य, देश आणि हे संपूर्ण जग हे याचे व्यापक रुपे आहेत. फक्त आपला दृष्टिकोन व्यापक केला तर ही संपूर्ण साखळी एकमेकांवर अवलंबून असल्याचे आपल्याला जाणवेल. या साखळीचा मुलाधार सर्वप्रथम आपले कुटुंबच आहे. परंतु, आजच्या युगात आपली एकत्र कुटुंब व्यवस्थाच जर मोडकळीस आली असेल तर एकसंघ समाज व राष्ट्राचे स्वप्न पूर्ण होण्यास अडचणी निर्माण होतील. मुळात 'वसुधैव कुटुंबकम्' ही संकल्पना आपण जगासमोर मांडली आहे; परंतु, आपल्याच देशात वाढत जाणारी वृध्दाश्रमांची संख्या पाहिली तर जिथे कुटुंबच एकत्र राहू शकत नाहीत तिथे या संकल्पनेला कसे मूर्त रुप मिळणार? ही विसंगती टाळायची असेल तर आधी घरातील माणसांनी एकत्र यायला हवं. जुन्या पिढीचे आदर्शवादी विचार व नवीन पिढीचे वास्तववादी विचार यांत कुठेतरी तडजोड होणे आवश्यक आहे. कुटूंबातील व्यक्तिचा विवाह झाल्यानंतर त्यांना आपल्याच जन्मदात्या आई वडिलांची अडचण वाटल्याने कोणताही विचार न करता त्यांना वृध्दाश्रमाची वाट दाखवणाऱ्या मुलांची प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढते आहे. 'हम दो हमारे दो' हम दो हमारा एक’ या आधुनिक विचारसरणीने कुटुंबाची व्याख्याच इतकी संकुचित केली की, ज्यांनी आपल्याला जगण्याचे सामर्थ्य दिले, ज्यांनी आपल्याला घडवलं त्यांच्याच घरातून त्यांना बाहेर काढण्याचा आपल्याला काय अधिकार? हा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही.परंतु, हे प्रमाण जरी अधिक असले तरी जुन्या पिढीनेही आपली मते थोपवली जात नाहीत ना ? याची काळजी घ्यायला हवी. नवीन पिढी ही अधिक स्वावलंबी, स्वत:चे निर्णय स्वत:च घेणारी आहे. हे निर्णय घेताना काही वेळा चुका होतील पण यातूनच योग्य तेच निर्णय घेण्याची समज त्यांना येईल. ‘विचारांमधील मतभेद' हेच घर विभक्त होण्याचे मुळ कारण आहे. विचारातील फरकाने तसेच समोरच्या व्यक्तिचे म्हणणे समजून न घेतल्याने नात्यांमधे दुरावा निर्माण होत जातो तेव्हा जुन्या पिढीने एखाद्या निर्णयाविषयी मार्गदर्शन जरुर करावे. पण आपल्या मतांचा अट्टहास धरु नये. म्हणून काही जुन्या परंपरांची कास आपण धरताना नव्या मतांची आस आपण मनातून स्वीकारली तर घरातील व्यक्ती आधी मनाने एकसंध होतील मगच कुटुंब खऱ्या अर्थाने एकत्र आल्याचे समाधान आपल्याला मिळेल. 'वसुधैवकुटुंबकम्' ही संकल्पना प्रत्यक्ष साकारताना आपल्याला दिसेल. ज्यात धर्म, जात, पंथ, देश या सीमा ओलांडल्या गेल्या असतील. मनाने एकरूप झालेल्या या विश्वात हिंसाचार, दहशतवाद, अराजकता, विध्वंस या कुप्रवृत्तींचे समुळ उच्चाटन होऊन 'हे विश्वचि माझे घर 'हा भाव प्रत्येक व्यक्तीच्या मनात नांदताना दिसेल.वसुधैव कुटुंबकम' ही भारतीय

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

संस्कृतीची मूळ संकल्पना आहे, जी अखिल मानवजातीला एक कुटुंब मानते. त्यातूनच विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करण्यास महत्वपूर्ण ठरते.

**शिक्षण अर्थ व संकल्पना :** शिक्षण ही ज्ञान, कौशल्ये, मूल्ये आणि सवयी आत्मसात करण्याची एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, जी व्यक्तीच्या सर्वांगीण विकासास मदत करते.हे केवळ पुस्तकी ज्ञान नसून, अनौपचारिक अनुभव आणि औपचारिक प्रशिक्षणाद्वारे मानवाला सुसंस्कृत, विचारक्षम आणि जबाबदार नागरिक बनवणारे एक प्रमुख साधन आहे. शिक्षणाद्वारे हे उदात्त मूल्य रुजवून वैश्विक बंधुता, शांतता, आणि समावेशकतेची भावना पिढीमध्ये निर्माण केली जाऊ शकते.शिक्षण हे केवळ माहितीचे साधन नसून ते चारित्र्य निर्माण करून, संकुचितता दूर करतं, ज्यामुळे विद्यार्थी स्वतःच्या प्रतिभेचा वापर संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी करण्यास सक्षम बनतात.

**शिक्षणाचा व्यापक अर्थ:-** 'शिक्षण म्हणजे माणसाच्या शरीराचे, मनाचे आणि आत्म्याचे सुसंवादी विकसन करणे होय'. शिक्षणातूनच कोणतीही शिक्षित व्यक्ती जीवनातील आव्हाने पेलू शकेल ही क्षमता त्याच्या अंगी निर्माण करणे. तसेच हे शिक्षण केवळ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली होत नाही, तर विद्यार्थी स्वतःच्या अनुभवातूनही शिकू शकतात. या अर्थाने जीवनानुभवातून स्वयं अध्ययन करणे ही बाब स्वरूपात शिक्षणाची व्यापकता दर्शविते.

## विचारवंताच्या दृष्टीतून शिक्षणाची संज्ञा

**जॉन हेनरीच पेस्टॉलॉजी (Johann Heinrich Pestalozzi) :** यांच्या मते, "शिक्षण म्हणजे मानवी क्षमतांचा नैसर्गिक, सुसंवादी आणि प्रगतीशील विकास होय" शिक्षण हे सामाजिक सुधारणेचे साधन आहे आणि शिक्षण घेणे हा प्रत्येकाचा, अगदी गरिबांचाही अधिकार आहे'.

**महात्मा गांधींच्या मते, :** "शिक्षण म्हणजे केवळ साक्षरता नसून, व्यक्तीच्या शरीर, मन आणि आत्म्याचा सर्वांगीण विकास होय" त्यांच्या 'मूलभूत शिक्षणात' (Basic Education) चारित्र्यनिर्मिती, मातृभाषेतून शिक्षण, हस्तव्यवसाय,कौशल्य प्रशिक्षण आणि आत्मनिर्भरतेवर भर दिला आहे.शिक्षण हे जीवनोपयोगी आणि अनुभवातून शिकणारे असावे, अशी त्यांची धारणा होती.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते, :** "शिक्षण हे सामाजिक परिवर्तन, समता, स्वातंत्र्य आणि बंधुता रुजवणारे सर्वात मोठे साधन आहे" शिक्षण हे व्यक्तिला त्याचा आत्मसन्मान आणि त्याच्या हक्कांची जाणीव निर्माण करून, शोषित समाजाला गुलामगिरीतून मुक्त करते'.

**शिक्षणाचा व्यापक अर्थ :-**'शिक्षण म्हणजे माणसाच्या शरीराचे, मनाचे आणि आत्म्याचे सुसंवादी विकसन करणे होय.शिक्षणातूनच जेणेकरून कोणतीही व्यक्ती जीवनातील आव्हाने पेलू शकेल. त्यामुळे अध्ययन अथवा शिक्षण हे केवळ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखालीच होत नाही, तर विद्यार्थी हे स्वतःच्या अनुभवातूनही शिक्षण घेऊ शकतात. त्यांच्या अध्ययानाची प्रक्रिया पूर्ण करू शकतात.

## शिक्षणाची उद्दिष्टे :-

व्यक्तिचे चारित्र्य निर्माण करणे,

बौद्धिक क्षमता वाढवणे,

सामाजिक मूल्ये रुजवणे

स्वावलंबी बनविणे

संस्कारक्षम बनविणे

समृद्ध नागरिक निर्माण करणे

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## शिक्षणाचे प्रकार

औपचारिक शिक्षण : 'शाळा, महाविद्यालयात मिळणारे पद्धतशीर शिक्षण म्हणजे औपचारिक शिक्षण होय'

अनौपचारिक शिक्षण :' दैनंदिन अनुभवातून, समाजात वावरताना मिळणारे प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे 'अनौपचारिक शिक्षण' होय'

निरौपचारिक शिक्षण (Non-formal Education) : हे शिक्षण औपचारिक शिक्षणापेक्षा लवचिक असते. हे शाळाबाहेर, परंतु नियोजित पद्धतीने (उदा. प्रौढ शिक्षण, मुक्त विद्यापीठ, कौशल्य विकास अभ्यासक्रम) दिले जाते.

**शिक्षणाचे महत्व :** शिक्षण हे मानवी जीवनाला परिपूर्ण बनवणारे आणि समाजात सुधारणा घडवून आणणारे एक शक्तिशाली माध्यम आहे. शिक्षण हे व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडवून आणणारे, अज्ञान दूर करणारे आणिचांगले-वाईट यात फरक करण्याची क्षमता देणारे एक महत्त्वाचे साधन आहे; ज्यामुळे व्यक्तीला ज्ञानाने परिपूर्ण होऊन आत्मविश्वास मिळतो, चांगले निर्णय घेता येतात, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात आणि समाजाच्या प्रगतीमध्येही योगदान देता येते, असे त्याचे महत्त्व आहे. थोडक्यात, शिक्षण हे व्यक्तीच्या आयुष्याचा पाया असून ते केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून आयुष्यभर चालणारी एक प्रक्रिया आहे, जी व्यक्ती आणि समाज दोघांसाठीही आवश्यक आहे. त्यामुळे शिक्षणाचे मानवी जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे.

## शिक्षणाचे फायदे :

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होतो.

शिक्षणातून व्यक्तिची विचार क्षमता व बौद्धिक क्षमतेची वाढ होते

शिक्षणातून स्वावलंबी प्रवृत्ती विकसित केल्या जाते.

व्यक्तिमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो

समायोजन क्षमता वाढीस लागते

देशाचा सजग आणि समृद्ध नागरिक म्हणून

शिक्षण हे केवळ नोकरी मिळविणे इतपत मर्यादित नसून शिक्षणाने माणसाचा जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टिकोन निर्माण होतो.

शिक्षण हे नवीन ज्ञान,कौशल्ये आणि क्षमता देते,ज्यामुळे व्यक्तीला नोकरी मिळवणे सोपे जाते आणि आर्थिक स्थिरता येते.

शिक्षण हे अज्ञान, अंधश्रद्धा आणि वाईट चालीरीती दूर करण्यास मदत करते.

शिक्षणातून मिळालेल्या ज्ञानाचा वापर करून व्यक्तीला जीवनात योग्य आणि माहितीपूर्ण निर्णय घेता येतात.

शिक्षणामुळे समाजातील लोक अधिक जागरूक, जबाबदार आणि सक्षम नागरिक बनतात, ज्यामुळे देशाचा विकास होतो.

शिक्षणाने व्यक्तीला आपल्या हक्कांची आणि जबाबदाऱ्यांची जाणीव होते.

शिक्षणामुळे चांगले उत्पन्न मिळवून जीवनमान उंचावता येते.

थोडक्यात, शिक्षण हे व्यक्तीच्या आयुष्याचा पाया असून ते केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून आयुष्यभर चालणारी एक प्रक्रिया आहे, जी व्यक्ती आणि समाज दोघांसाठीही आवश्यक आहे.

**'वसुधैव कुटंबकम' या संकल्पनेचा अर्थ :** वसुधैव कुटुंबकम'म्हणजे "संपूर्ण पृथ्वी एकच कुटुंब आहे"(वसुधा+एव+कुटुंबकम म्हणजे पृथ्वी हेच कुटुंब) ही प्राचीन भारतीय विचारधारा असून, ती जगाला "हे विश्वची माझे घर" असे मानते. ही संकल्पना महा उपनिषदातून आली असून, 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' असा संदेश देते. 'वसुधैव कुटूबकम' ही भारतीय संस्कृतीची मूळ संकल्पना आहे, जी अखिल मानवजातीला एक कुटुंब मानते.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**मुख्य पैलू आणि अर्थ :-** मूल अर्थ: हे जग ही एकच महाकुटूंब आहे, जिथे सर्व माणसे आणि प्राणी एकमेकांशी जोडलेले आहेत.

**मूळ स्थान :-** 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना जी महाउपनिषदात आढळते. ही संकल्पना एक पृथ्वी, एक कुटुंब, एक समाज, एक राज्य, एक देश, एक विश्व या अर्थाने वैश्विक शांतीचा संदेश देते.

**उद्देश:-**'वसुधैव कुटुंबकम' हा वैश्विक मूल्याचा विचार मानवामध्ये बंधुभाव, प्रेम, एकता, आणि सहकार्याची भावना वाढवतो.

**मानसिकता बदल :-** हे मूल्य उदार चरित्राच्या लोकांना 'माझे आणि परके' या भेदाच्या पलीकडे जाऊन, सर्व जगाला आपले कुटुंब मानण्यास प्रेरित करते. थोडक्यात, 'वसुधैव कुटुंबकम' ही जात, धर्म, पंथ, संप्रदाय, या सीमांच्या पलीकडे जाऊन सर्व सजीवांना एका कुटुंबाचा भाग मानणारी एक महान भारतीय संकल्पना आहे.

**वसुधैव कुटुंबकम संज्ञा व संकल्पना :** कुटुंब हे एक प्रशिक्षण स्थळ म्हणून काम करते.खुल्या संवादाचे पालन करणारी, विविधतेचा आदर करणारी आणि शांततेने संघर्ष सोडवणारी मजबूत कुटुंबे ही मूल्ये समाजात घेऊन जाणाऱ्या व्यक्तींना वाढवतात. कौटुंबिक मूल्ये सामाजिक नीतिमत्तेला आकार देतात.वसुधैव कुटुंबकम्' म्हणजे संपूर्ण जग एक कुटुंब आहे.या मूल्याची समाजात रुजवणूक करण्यासाठी, आपण विविध संस्कृतींचा आदर करणे, सहानुभूती दाखवणे, सर्वांना समान समजणे आणि आपल्या कृतीतून इतरांना प्रेरणा देणे होय. यावर वर्गात चर्चा करू शकतो, जसे की सांस्कृतिक कार्यक्रमातून विविधता साजरी करणे, गरजूंना मदत करणे, आणि भेदभाव न करता सर्व धर्मांच्या लोकांसोबत सामाजिक कार्यात भाग घेणे. याशिवाय भारतीय संस्कृतीची ही मूळ संकल्पना आहे, जी अखिल मानवजातीला एक कुटुंब मानते.

**शिक्षणातून 'वसुधैव कुटुंबकम'या मूल्याची रूजवणूक :** अध्ययन ही अविरत चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे मानवाच्या जन्मापासून ते मृत्यूपर्यंत माणूस सतत नवीन काहीतरी शिकत असतो. याच शिक्षणाच्या माध्यमातून त्याच्यामध्ये जी संस्कारक्षम मूल्ये रुजविले जातात त्यातूनच त्याच्या जीवनाला व व्यक्तित्वाला आकार मिळत असतो.त्याप्रमाणे शिक्षणातून 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना पुढील मूल्यांच्या आधारे अध्ययनातून निर्माण करता येऊ शकते.

**समानतेची भावना :-**आपण सर्व एकाच पृथ्वीचे रहिवासी आहोत, म्हणून जात, धर्म, लिंग किंवा प्रांत यावर आधारित कोणताही भेदभाव करू नये.प्रत्येक व्यक्तीचा आदर करणे आणि त्यांना समान संधी देणे महत्त्वाचे आहे.

**विविधतेचा स्वीकार:-**आपल्या वर्गात किंवा समाजात असलेल्या विविध संस्कृती, भाषा आणि परंपरा समजून घेण्याचा आणि त्यांचा आदर करण्याचा प्रयत्न करणे.आपण एकात्मतेच्या भावनेने राष्ट्रीय सण-उत्सव एकत्रित पणे साजरे करणे

**सहानुभूती आणि मदत:** जे लोक अडचणीत आहेत, त्यांना मदत करणे हे आपले कर्तव्य आहे. गरजूंना मदत करण्यासाठी आपण 'एक कुटुंब' म्हणून एकत्र येणे इतरांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करणे. व इतराच्या सुखद प्रसंगापेक्षा ही कठीण, समस्याग्रस्त , दु:खद प्रसंगात प्रत्यक्ष मदत करून सहानुभूती देणे महत्त्वाचे असते.

**कृतीतून आदर्श निर्माण करणे:-**"मी स्वतः इतरांशी प्रेमाने वागेन आणि कोणाशीही वैर भाव ठेवणार नाही. माझ्या चांगल्या वागणुकीतून इतरांना प्रेरणा देईन.पर्यावरणाची काळजी घेणे, कारण संपूर्ण निसर्गही आपले कुटुंब आहे.

**शैक्षणिक उपक्रम:-**आपण 'वसुधैव कुटुंबकम्' या विषयावर विविध प्रकल्प करू शकतो, जिथे आपण जगातील विविध देशांतील मुलांविषयी माहिती मिळवून आपण एकत्र मिळून स्वच्छता मोहीम, अधश्रद्धा निर्मूलन, किंवा सामुहिक वृक्षारोपण करणे, सामुहिक वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करणे, लोकसंख्या वाढीस नियंत्रित करणे यातून जेणेकरून समाजाला काहीतरी चांगले देता येईल. ही भावना शैक्षणिक उपक्रमाद्वारे निर्माण करणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**चर्चा आणि संवाद:-**आपण 'वसुधैव कुटुंबकम' या वैश्विक मूल्यावर नियमितपणे चर्चा करून जेणेकरून ते आपल्या रोजच्या जीवनाचा भाग बनविणे.आपल्या शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे जिथे सर्वजण एकत्र येतील. या सर्व मुशिक्षणद्द्यांवर चर्चा केल्यास, 'वसुधैव कुटुंबकम्' या मूल्याची खरी भावना समाजात रुजवण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने काम करू शकतो. वसुधैव कुटुंबकम ही भारतीय संस्कृतीची मूळ संकल्पना आहे, जी अखिल मानवजातीला एक कुटुंब मानते.

## वसुधैव कुटुंबकम आणि शिक्षणाचा संबंध

**मूल्य-आधारित शिक्षण:** आधुनिक शिक्षण प्रणालीमध्ये 'वसुधैव कुटुंबकम'चे मूल्य समाविष्ट करणे आवश्यक आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पूर्वग्रह आणि भेदभावाचे अडथळे तोडण्याची प्रेरणा मिळेल .

**जागतिक नागरिकत्व:-**शिक्षणाचा उद्देश केवळ रोजगार मिळवणे नसून, एका वैश्विक कुटुंबाचा सदस्य म्हणून इतर देशांतील लोकांच्या दुःखात सहभागी होण्याची वृत्ती व सहानुभूती विकसित करणे हा असायला हवा.

संस्कृती आणि शाश्वतता: हे तत्त्व भौगोलिक, सांस्कृतिक किंवा धार्मिक विभाजनांच्या पलीकडे जाऊन, शाश्वत विकासासाठ एकत्र येण्याची प्रेरणा देते.

**सामूहिक जबाबदारी:-**शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये 'हे माझे, ते दुसऱ्याचे' अशी संकुचित भावना दूर होऊन, 'सर्वजण माझेच' हे विश्वाचि माझे घर अशी व्यापक भावना निर्माण करणे. ही शिक्षणाची सामुहिक जबाबदारी ठरते.

**शिक्षण प्रणालीत समावेश :** NEP 2020आणि आधुनिक शिक्षण पद्धतीमध्ये, शिक्षण हेच "वसुधैव कुटुंबकम" साध्य करण्याचे प्रमुख साधन आहे.यामध्ये केवळ तांत्रिक कौशल्ये नव्हे, तर मानवी मूल्ये, सहकार्य आणि सहिष्णुतेवर भर दिला जातो, ज्यामुळे एक सुसंवादी जग निर्माण होईल.वसुधैव कुटुंबकम्' संपूर्ण जग एक कुटुंब आहे.या मूल्याची समाजात रुजवणूक करण्यासाठी, आपण विविध संस्कृतींचा आदर करणे, सहानुभूती दाखवणे, सर्वांना समान समजणे आणि आपल्या कृतीतून इतरांना प्रेरणा देणे यावर वर्गात चर्चा करू शकतो, जसे की सांस्कृतिक कार्यक्रमातून विविधता साजरी करणे, गरजूंना मदत करणे, आणि भेदभाव न करता सर्व धर्मांच्या लोकांसोबत सामाजिक कार्यात भाग घेणे.

## शिक्षणातून वसुधैव कुटुंबकमचे मुख्य पैलू

**जागतिक नागरिकत्व:-** आधुनिक शिक्षण विद्यार्थ्यांना केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता, संपूर्ण जगाचा विचार करणारे "जागतिक नागरिक" म्हणून विकसित करते.

**मूल्य-आधारित शिक्षण:-** 'अयं निजः परोवेति' (हा माझा, हा परका) ही संकुचित वृत्ती सोडून, उदार चरित्राची भावना रुजवणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

सांस्कृतिक विविधता आणि एकता:- भिन्न धर्म, संस्कृती आणि सामाजिक गटांमध्ये सलोखा राखण्यासाठी हे तत्त्व शिक्षण प्रणालीत एकात्मतेचा संदेश देते.

**शैक्षणिक नैतिकता:-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP 2020 नुसार, विद्यार्थ्यांमध्ये करुणा, सहानुभूती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे, जेणेकरून ते जागतिक कुटुंबासाठी उपयुक्त ठरेल.

**सर्वसमावेशकता:-** जगातील सर्व व्यक्तींना, दारिद्र्य किंवा भेदभावाच्या पलीकडे जाऊन शिक्षणाची व प्रगतीची समान संधी मिळणे, हे या तत्त्वाचे यश आहे.

शिक्षणाद्वारे हे उदात्त मूल्य रुजवून वैश्विक बंधुता, शांतता, आणि समावेशकतेची भावना पिढीमध्ये निर्माण केली जाऊ शकते.शिक्षणाद्वारे हे उदात्त मूल्य रुजवून वैश्विक बंधुता, शांतता, आणि समावेशकतेची भावना पिढीमध्ये निर्माण केली जाऊ

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

शकते. हे केवळ माहितीचे साधन नसून ते चारित्र्य निर्माण करून, संकुचितता दूर करतं, ज्यामुळे विद्यार्थी स्वतःच्या प्रतिभेचा वापर संपूर्ण जगाच्या कल्याणासाठी करण्यास सक्षम बनतात

**सारांश :** शिक्षण आणि 'वसुधैव कुटुम्बकम' या वैश्विक मूल्याचे अध्ययन केल्यानंतर आपणास असे लक्षात येते की, 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना मुळात फार प्राचीन आणि शाश्वत मूल्याची संकल्पना आहे. या संकल्पनेतून विश्वबंधुत्वाची भावना निर्माण करणे ही मुळातील बाब अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. खऱ्या अर्थाने या विश्वात मानव प्राणी जन्माला आलेला आहे तेव्हा त्याच्या जन्मानंतरच्या विकसित प्रक्रियेमध्ये ज्या देशाच्या भूमीमध्ये त्याचा जन्म होतो. तो ज्या राज्यात, जिल्ह्यात अथवा गावा-शहरात राहतो त्या सभोवतालच्या वातावरणातून तेथील संस्कार आणि मूल्यातून त्याची जडणघडण होत असते. त्या जडणघडणीतूनच त्याचं व्यक्तिमत्त्व साकार होत असते. परंतु त्याच्या मनामध्ये आणि विचारांमध्ये ज्या मूल्यांची रुजवणूक होत असते त्यातून त्याच्या विचाराची व्यापकता ठरविल्या जात असते. परंतु होते असे की,मानव प्राणी हा त्याच्या एकूण व्यक्तिमत्व विकसन प्रक्रियेमध्ये संकुचित भावनेने जगायला लागतो. तो स्वतःला केवळ मी आणि माझं कुटुंब, मी आणि माझं जगणं, मी आणि माझा जगण्याचा मार्ग, मी आणि माझ्या जगण्याची पैलू, मी आणि माझं उदरनिर्वाह, मी आणि माझं अस्तित्व, मी आणि माझे आप्तेष्ट या संकुचित भावनेने तो जगायला लागतो. पण खऱ्या अर्थाने ज्या समाजात तो जगतो.त्या समाजातून त्याच्या जीवनाच्या विविध पैलूंवर त्या सामाजिक संस्कारांचा प्रभाव त्याच्या एकूण जगण्यावर पडत असतो. त्या अर्थाने कोणत्याही व्यक्तीचे समाजाशिवाय जगणे हे जगणेच नसते. जर तो व्यक्ती समाज, गाव,शहर,जिल्हा, राज्य, देश आणि विश्व या दृष्टीने जर तो आपल्या जीवनाकडे बघत असेल तर खऱ्या अर्थाने त्याच्यामध्ये 'वसुधैव कुटुंबकम' या वैश्विक मूल्याची रुजवणूक निर्माण होत आहे असे म्हणता येईल. यामध्ये माणूस हा औपचारिक शिक्षणातून काही मूल्ये आत्मसात करत असतो. तर जे लोक औपचारिक शिक्षण न घेता अनौपचारिक शिक्षणातून अनुभूतीच्या आधारे विविध मूल्यांचे संस्कार त्या व्यक्तीच्या मन:पटलावर व त्याच्या एकूणच व्यक्तिमत्त्वावर प्रभाव करीत असतात; त्या मूल्यातून मानवाची जी जडणघडण होत असते. त्याच्या एकूणच विचारसरणीमध्ये मी च्या ऐवजी आम्हीच भावना रुजायला लागते. त्यातूनच खऱ्या अर्थाने 'वसुधैव कुटुंबकम' या वैश्विक मूल्याची भावना निर्माण होत असते. आणि म्हणूनच औपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी अगदी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत या एकूण शिक्षणाच्या प्रक्रियेमधून त्या विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व जे निर्माण होत असते त्यातूनच त्याच्या एकूण शिक्षण प्रक्रियेमध्ये जर 'वसुधैव कुटुम्बकम' या वैश्विक मूल्याच्या संकल्पनेमध्ये तर जर त्या विद्यार्थ्यांमध्ये हे विश्व, देश, हे राज्य, हा समाज, हे गाव,हे शहर आणि माझे कुटुंब याबाबत आम्ही सगळे एक आहोत. ही भावना शैक्षणिक परिप्रेक्ष्यातून विविध उपक्रमांच्या माध्यमातून सर्वधर्म समभाव, धर्मनिरपेक्षता समता,बंधुता आणि न्याय या दृष्टिकोनातून विश्वबंधुत्वाची भावना त्याच्यामध्ये निर्माण केल्या जाते.त्यातूनच 'वसुधैव कुटुंबकम' या वैश्विक मूल्यांची खऱ्या अर्थाने रुजूवणुक होण्यास सहाय्यभूत ठरते. थोडक्यात सांगायचे तर, शिक्षण हे केवळ माहितीचे भांडार नसून, ते मानवाला 'वसुधैव कुटुंबकम'च्या भावनेतून विचार करण्यास आणि कृती करण्यास सक्षम करते.शिक्षण हे मानवी जीवनाला परिपूर्ण बनवणारे आणि समाजात सुधारणा घडवून आणणारे एक शक्तिशाली माध्यम आहे. शिक्षण हे व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडवून आणणारे, अज्ञान दूर करणारे आणि चांगले-वाईट यात फरक करण्याची क्षमता देणारे एक महत्त्वाचे साधन आहे; ज्यामुळे व्यक्तीला ज्ञानाने परिपूर्ण होऊन आत्मविश्वास मिळतो,.चांगले निर्णय घेता येतात, रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात आणि समाजाच्या प्रगतीमध्येही योगदान देता येते. या सर्व बाबी आत्मसात करित असताना त्याच्या मध्ये विश्वबंधुत्वाची भावना निर्मास होण्यास सहाय्यभूत ठरते.

## संदर्भ ग्रंथ

म.बा कुंडले,शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र नुतन प्रकाशन पुणे, 1998

अरविंद दुनाखे,'शैक्षणिक व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन' नुतन प्रकाशन पुणे,2006

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

वि. ना देवधर, 'अभ्यासाच्या पाऊलवाटा' राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळे पुणे-1983

रा.श मुळे, 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे' विद्या बुक्स औरंगाबाद-1998

संतोष मुळावकर आणि कल्पना मुळावकर 'मूल्यशिक्षण सुसंवाद' विद्या प्रकाशन नागपूर-2005

NEP-2020 ड्रॉफ्ट 'महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग' मुंबई